वाहतुक बदल अधिसुचना

जा.क्र./पोउआ/वाहतुक/नियोजन/१८३४/२०२३ पिंपरी चिंचवड शहर दिनांक १९ /०५/२०२३

राष्ट्रीय महामार्ग क्र.४८ जवळील भुजबळ चौक ते सयाजी अंडरपास सर्व्हीस रोडवर या भागात पावसाळ्यात पाण्याचा निचरा होत नाही व सेवा रस्त्यावर पाणी जमा होवुन वाहन चालकांना अडचणी निर्माण होत असुन सदर ठिकाणी पावसाळ्याच्या पाण्याचा निचरा करणे संबंधी काम करण्यात येणार आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन प्राप्त हरकती व सुचनांचा विचार करून मी काकासाहेब डोळे, पोलीस उप आयुक्त, परि २, अति.कार्य. पोलीस उप-आयुक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बध असतील ते रद्द करण्यात येत असुन सदरचे काम पुर्ण होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**हिंजवडी वाहतुक विभाग**

**१)सुर्या अंडरपास कडुन सर्व्हिस रोडने वाकडनाका मार्गे सयाजी अंडरपासकडे जाणारी सर्व प्रकारची वाहने ही इंडियन ऑईल चौक, कस्तुरी चौक, भुमकर चौक मार्गे ईच्छीत स्थळी जातील.**

**२)इंडियन ऑईल चौकाकडुन सर्व्हिस रोडने वाकडनाका मार्गे सयाजी अंडरपास व वाकडगावाकडे जाणारी वाहतूक सावतामाळी मंदिर येथुन वाकड फ्लायओव्हर ब्रिजवरुन ईच्छीत स्थळी जातील.**

**३)इंडियन ऑईल चौकाकडुन सर्व्हिस रोडने वाकडनाका-सयाजी अंडरपास- युटर्न-वाकडनाका सातारालेन मार्गे हायवे रोडला जाणारी वाहतुक हि वाकड फ्लायओव्हर ब्रिज वरुन वाकडगाव युटर्न घेवुन वाकडनाका सातारालेन मार्गे हायवे रोडने इच्छित स्थळी जातील.**

**४) इंडीयन ऑईल चौक येथुन वाकडनाका मार्गे सर्व्हिस रोडने सयाजी अंडरपास-मार्गे हायवेला जाणारी वाहने ही वरील मार्गे न जाता ती कस्तुरी चौक- विनोदे वस्ती- भुमकर चौक मार्गे इच्छीत स्थळी जातील.**

वरील आदेशाची दिनांक २१/०५/२०२३ पासुन ३१ / ०५ /२०२३ पर्यंत वैध राहील.

तरी नागरीकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा, वरील प्रमाणे वाहतुक बदलाबाबत वॉर्डन व वाहतुक कर्मचारी यांना सहकार्य करावे असे अवाहन पिंपरी चिंचवड शहर, वाहतुक शाखा यांचे मार्फतीने करण्यात येत आहे.

(काकासाहेब डोळे)
पोलीस उप आयुक्त,परि २
अति.कार्य. वाहतूक पिंपरी चिंचवड

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,
नविन मध्यवर्ती इमारत, पुणे – ०१

Scanned with CamScanner